ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# 'लिंग शाळा आणि समाज' ह्या पेपरमधील प्रात्यक्षिक कार्यातून विकसित होणा–या मूल्यांचा अभ्यास.

**प्राचार्या डॉ.पांढरे विद्युलता ज्ञा.**
उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर

★★★

**प्रस्तावना रू** – 2015 मध्ये बी.एड्. अभ्यासक्रमाची NCTE व्दारे पुर्नरचना करण्यात आली. बी.एड्. अभ्यासक्रम हा दोन वर्षाचा करण्यात आला. ह्या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात काळाच्या गरजेनुसार नवीन विशयांचा समावेश करण्यात आला. त्यातीलच एक विषय लिंग, शाळा आणि समाज ह्या विषयातून लिंगविषमता नष्ट करुन लिंग समानतेकडे वाटचाल करण्यासंबंधी विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. विविध स्त्री–पुरुष विषयक संकल्पना, समाजाची स्थिती, बदलाचे विविध घटक इ. आशयाचा समावेश पेपरमध्ये आहे. तात्विक भागाबरोबरच लिंग समानता रुजविण्यासाठी, विविध प्रात्यक्षिक कार्याचा समावेष केला आहे. ह्या प्रात्यक्षिक कार्यातून लिंग समानता रुजविणे हा प्रमुख उद्देष्य समोर ठेवून त्यावर आधारित बी.एड्. प्रशिक्षणार्थीस कार्य दिल्यास निश्चित त्यांच्या लिंग समानता रुजण्यास मदत होईल. हा दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. हाच दृश्टिकोन समोर ठेवून संषोधकाने एका प्रात्यक्षिकाची निवड केली आहे. त्यामध्ये विविध क्षेत्रातील आदर्श कार्य केलेल्या महिलांचा अभ्यास आणि सद्यस्थितीत आदर्श कार्य करणाऱ्या महिलांचा अभ्यास करण्यास प्रशिक्षणार्थीना प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करताना त्यांच्यामध्ये कोणकोणते मूल्य विकसित झाली. याचा अभ्यास सदर संशोधनामध्ये संशोधकाने करण्याचे निश्चित केले आहे.

**महिलांची विविध कार्य क्षेत्रे सामाजिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, क्रिडा क्षेत्र, राजकीय क्षेत्र,सांस्कृतिक क्षेत्र**

**सामाजिक क्षेत्र** – समाजात समाजसेवा तसेच विविध सामाजिक कार्य करुन महिलांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. उदा. सिंधूताई सपकाळ

**शैक्षणिक क्षेत्र** – शिक्षणाच्या बळावर आज सर्वच शिक्षणक्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविला आहे. आज दहावी, बारावीच्या निकालात मुली ह्या मुलांच्यापेक्षा जास्त गुण घेवून उत्तीर्ण होतात. अनेक उच्च पदावर महिला आज शिक्षणाव्दारे पोहचल्या आहेत.

**उदा.** सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.मणालिनी फडणवीस, एस. एन.डी.टी. विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.वसुधा कामत इ. उदाहरणे आपणास पहावयास मिळतात.

**क्रिडा क्षेत्र** – शिक्षणाबरोबरच देशात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवर महिलांनी आपले उच्च स्थान प्राप्त केले आहे. विविध/सर्वच क्रिडा प्रकारात महिलांचा सहभाग आहे. उदा. सानिया मिर्झा.

**राजकीय क्षेत्र** – स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणाच्या दृष्टीने 73 वी घटनादुरुस्ती खरोखर एक क्रांतिकारक पाऊल होते. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना 33ः आरक्षण प्राप्त झाले. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेविका, नगराध्यक्ष, जिल्हा परिशद सदस्या व अध्यक्षा यासारख्या विविध पदांवर त्या विराजमान झाल्या आणि आपल्याकडील क्षमता सिध्द करुन दाखवित आहे.

**उदा.** देशाच्या प्रथम अर्थमंत्री निर्मला सीतारामन, अनेक खासदार, आमदार पदावर आज महिला विराजमान आहेत.

**सामाजिक क्षेत्र** – भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असून समाजात स्त्रीला दुर्बल घटक असे स्थान दिले गेले. आज ह्यामध्ये बदल होण्यासाठी बालपणापासूनच कुटुंबात मुलगा आणि मुलगी यांना समानतेचे संस्कार करणे, मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील परंपरा, रुढीबध्दता, प्रथा यांना नष्ट करणे हे कार्य आज समाजातील काही कुटुंब करत असलेले आपणास दिसून येतात. त्यामुळे आज मुलींना चांगले शिक्षण देण्यात पालक जागरुक झाला आहे.

**सांस्कृतिक क्षेत्र** – विविध सांस्कृतिक क्षेत्रातही आज महिला आपणास आपल्या कलेच्या जोरावर नावलौकिक मिळवत असलेल्या दिसून येतात.

**2 संशोधनाची गरज व महत्व –**

1) लिंग, शाळा व समाज पेपरमधून प्रात्यक्षिक कार्यातून महिलांच्या विविध कार्याची ओळख.
2) महिलांच्या विविध कार्यक्षेत्रांची ओळख
3) समाजास स्त्री–पुरुष समानता प्रदान करण्यासाठी
4) बी.एड्. प्रशिक्षणार्थी मध्ये स्त्री सक्षमतेविषयी विविध मूल्य विकसित करण्यासाठी.

**3. संशोधनाची उद्दिष्टये –**

1) बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये 'लिंग, शाळा व समाज' पेपरमधील प्रात्यक्षिक कार्याची माहिती देवून त्यावर आधारित प्रात्यक्षिक

कार्य राबविणे.

2) बी.एड्. प्रशिक्षणार्थींवर 'लिंग, शाळा व समाज' पेपरमधील प्रात्यक्षिक कार्याच्या पुर्तीनंतर विकसित झालेल्या मूल्यांच्या संदर्भात अभ्यास करणे.

3) बी.एड्. प्रशिक्षणार्थींमध्ये 'लिंग, शाळा व समाज' पेपरमधील प्रात्यक्षिक कार्यपुर्तीचा अभ्यास करणे.

**4. संशोधन व्याप्ती** – बी.एड्. प्रशिक्षण घेणाऱ्या 40 प्रशिक्षणार्थींचा समावेश सदर संशोधनात करण्यात आला आहे.

**5. संशोधन मर्यादा**

1) प्रस्तुत संशोधन हे बी.एड्. प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीपुरतेच मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन हे उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय पंढरपूरमधील बी.एड्. प्रशिक्षणार्थीपुरते मर्यादित आहे.

3) प्रस्तुत संशोधन हे 'लिंग, शाळा व समाज' ह्या पेपरच्या प्रात्यक्षिक कार्यापुरते मर्यादित आहे.

**संशोधन पध्दती व न्यादर्श – संशोधन पध्दती** – प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला आहे.

**न्यादर्श** – संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी 40 प्रशिक्षणार्थी गटाची निवड केली आहे.

**संशोधन कार्यपध्दती** – संशोधकाने प्रथम प्रात्यक्षिक कार्यासंबंधी प्रशिक्षणार्थींना संपूर्ण माहिती सांगितली. कार्य कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींकडून समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या आणि कार्य करत असलेल्या महिलांची माहिती प्रशिक्षणार्थींनी संग्रहीत केली. त्यानंतर संशोधकानी महिलांविषयक काही निवडक मूल्यांची चेकलिस्ट यादी प्रशिक्षणार्थींना दिली. आपण केलेल्या प्रात्यक्षिक कार्यातून आपणांस कोणत्या मूल्यांची ओळख झाली, बोध झाला यासंबंधी चेकलिस्टमध्ये खुणा करण्सयास सांगितल्या. संकलिट चेकलिस्ट वरुन त्याचे शेकडेवारीमध्ये विष्लेशण करण्यात आले. त्याव्दारे प्रात्यक्षिक कार्यातून प्रषिक्षणार्थीमध्ये महिलांविशयक विकसित झालेल्या मूल्यांचा अभ्यास करण्यात आला.

**संकलित माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

संकलित माहितीचे वर्गीकरण करुन पुढीलप्रमाणे अर्थनिर्वचन करण्यात आले. 40 प्रशिक्षणार्थीव्दारे हे अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे खालील मूल्यांच्या आधारे प्रात्यक्षिक चेकलिस्ट व्दारे पडताळण्यास सांगितले.

| | |
|---|---|
| **1) प्रामाणिकपणा** | **5) त्याग** |
| **2) खिलाडूवशती** | **6) सकारात्मकवृत्ती** |
| **3) जिद्द** | **7) सामाजिकता** |
| **4) सहकार्य** | **8) न्याय, समता** |

**निष्कर्श** –

1) प्रामाणिकपणा हे मूल्य 100टक्के प्रात्यक्षिक कार्यात दिसून येते, असे सर्व प्रशिक्षणार्थींनी स्पष्ट केले. प्रत्येक महिलेचे कार्य प्रामाणिकपणे केल्यामुळे ते विशिष्ट उंचीपर्यंत पोहचू शकल्या.

2) 'खिलाडूवृत्ती' हे मूल्य 30टक्के प्रात्यक्षिक कार्यात आलेले आहे. ज्या प्रशिक्षणार्थींनी खेळाडू महिलांचा अभ्यास केला आहे. अशा प्रात्यक्षिकात खिलाडूवृत्ती हे मूल्य दिसून आले.

3) जिद्द' हे मूल्य सर्व प्रात्यक्षिकांत दिसून येते म्हणजे 100टक्के प्रमाण असून 'त्याग' ह्या मूल्यांचे प्रमाणत 60टक्के प्रात्यक्षिकांमध्ये दिसून येतो.

4 सकारात्मक वृत्ती', 'सामाजिकता' ह्या मूल्यांचे प्रमाण ही सर्व प्रात्यक्षिकांत दिसून येते. त्याचे ही प्रमाण 100टक्के आहे.

**समारोप** – विभिन्न सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्य करण्यासाठी महिलांनी विविध मूल्यांची जोपासना केलेली दिसून येते. मूल्यांच्याआधारे त्या आपल्या कार्याव्दारे यशस्वी झाल्या. समाजाला एक आदर्श घालून दिला. हा आदर्श सर्वांच्यासाठी एक प्रेरणा असून निश्चित ह्या महिलांच्या कार्याचा आढावा घेतल्यास अभ्यास केल्यास जीवनाला दिशा, बोध मिळण्यास मदत होते. विविध मूल्यांची रुजवणूक होण्यास प्रेरणा मिळते. म्हणून बी.एड्. प्रशिक्षणार्थींसाठी हे प्रात्यक्षिक अत्यंत उपयुक्त आहे.

**संदर्भग्रंथ सूची** –

*1. मरजे, पवार (2016) लिंगभाव, शाळा व समाज, प्रशांत पब्लिकेशन.*

*2. B-Ed- Curriculum and its frameworks 2018, Solapur*